नि.फौ.खटला क्र. १०६/२०१९
सरकार वि. शंकर व इतर
निशाणी क्र. २४ खाली

**साक्षीदार क्र. १ याचा उलटतपास शपथेवर सुरु** :–
**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. ए.व्ही. गजभिये यांच्यामार्फत** :–

२} हे म्हणणे खरे नाही की, माझे दोन्ही मुलं आता १४–१५ वर्षांची आहेत. माझी मुलगी सातवीमध्ये शिकत आहे आणि माझा मुलगा चौथीमध्ये शिकत आहे. माझ्या घरापासून पोलीस स्टेशनला गाडीवर आल्यास ५ मिनीटे लागतात व पायी आल्यास १० ते १५ मिनीट लागतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याविरुद्ध रामटेक पोलीस स्टेशन येथे चोरी व घरफोडीचे ४–५ गुन्हे दाखल झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे घर वस्तीमध्ये आहे व आजूबाजूला इतर लोकांची राहती घरे आहेत.

३} हे म्हणणे खरे आहे की, आरोपी संजय केळवदे यांची बहीण माया केळवदे यांनी दि. १९/०८/२०१८ च्या रात्री मी तिच्या लहान मुलीवर बलात्कार केल्याची तक्रार दाखल केली होती.

**प्रश्न** – माया केळवदे यांनी तक्रार दाखल केल्यावर तुमच्यावर पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता का ?

**उत्तर** – मला आधी घरी येऊन मारहाण केली होती. पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता.

४} हे म्हणणे खरे नाही की, मला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी तक्रार दाखल करण्यापूर्वी माया केळवदेने तक्रार दाखल केलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/०८/२०१८ रोजी रात्री पोलीस माझ्या घरी आले होते. तथाकथित घटनेनंतर मी दवाखान्यात होतो. माझ्या घरच्यांनी तक्रार दाखल केली होती.

**प्रश्न** – दि. १९/०८/२०१८ रोजी पोलीस आले त्यावेळी त्यांनी तुमच्याकडे चौकशी

केली होती.

**<u>उत्तर</u>** – मी शुद्धीत नव्हतो.

५} हे म्हणणे खरे नाही की, मी शुद्धीत नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. १९/०८/२०१८ रोजी रात्री पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती व त्यावेळी मी आरोपीविरुद्ध काहीही सांगितले नव्हते.

६} माझ्या सरतपासातील मजकुर की, '<u>तेव्हा आरोपी शंकरने दरवाजा लात मारून तोडला. मी पलंगावर झोपलो होतो</u>', ही बाब मी जबाब देतांना पोलीसांना सांगितली होती. माझ्या सरतपासातील मजकुर की, '<u>मी बचावासाठी उठलो तेव्हा त्याने माझ्या डाव्या हातावर मारले, तेव्हा आरोपीचे भाऊ–बहीण घरात शिरले व त्यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली, माझी पत्नी मध्ये आली तेव्हा तिच्यावर सुद्धा शस्त्र उगारले</u>', ही बाब मी जबाब देतांना पोलीसांना सांगितली होती. माझ्या सरतपासातील मजकुर की, '<u>तेव्हा आरोपीच्या बहिणीने त्याला तेथून निघून जाण्यास सांगितले तेव्हा आरोपी परत माझ्या घरातून निघून गेला</u>', ही बाब मी जबाब देतांना पोलीसांना सांगितली होती. सदर बाबी माझ्या जबाबात नाहीत व त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शंकर माझ्या घरी आला नाही व मला शस्त्राने मारले नाही त्यामुळे सदर बाबी माझ्या जबाबात आणि रिपोर्ट नि.क्र. २५ मध्ये नमुद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, वरील बाबी घडल्या नव्हत्या त्यामुळे मी त्या जबाब आणि रिपोर्ट देतांना सांगितल्या नाहीत.

७} हे म्हणणे खरे नाही की, माया केळवदे यांनी मी त्यांच्या मुलीवर बलात्कार केल्याच्या घटनेची तक्रार दिल्याने त्या तक्रारीला शह देण्याकरीता मी चार दिवसांनी खोट्या मजकुराची सदरची फिर्याद दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मी सांगितलेला संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी शंकर माझ्या घरात आला नाही व त्याने मला सत्तुरने डोक्यावर व डाव्या हातावर मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे अशी कोणतीही घटना घडली नाही व मी खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मायाबाई माझ्या घराजवळ राहते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याविरुद्ध बलात्काराची तक्रार दाखल झाल्याचे कळल्यावर मी स्वतः माझे डोके आपटून घेऊन ईजा करून घेतली होती व मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टिकल–अ वरील सत्तुरचा आरोपीशी कोणताही संबंध नाही

व त्याने मला मारहाण झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला फसविण्याकरीता मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण,

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

सही/–

रामटेक.

(ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २५/११/२०२५.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, रामटेक.